I. O. करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0157 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/02/2023 03:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ३९२ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 16/02/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2023

**Time From (वेळेपासून):** 17:09 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/02/2023 **Time (वेळ):** 02:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/02/2023 02:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कोतवाली पोलीस स्टेशन ,अहमदनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): -सुभाष ुंबरलाल सुरपुरिया

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1962

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देहरे ता जि अहमदनगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देहरे ता जि अहमदनगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | एकनाथ पंडीत निपसे | | | 1. कोतवाली पोलीस स्टेशन , कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ध्वनी उपकरणे | शासकीय डीजीटल व्हाईस रेकर्डर | 7,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सुभाष झुंबरलाल सुरपुरिया, वय 61 वर्षे, धंदा व्यापार, रा.देहरे ता.जि.अहमदनगर मो.नं.9665120401 समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून मी दि.16/02/2023 रोजी अँन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर येथे येवून पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांना एका लोकसेवका विरूध्द लाच मागणीची तक्रार सांगितली. पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी कार्यालयात हजर असलेले पोलीस निरीक्षक श्री गोर्डे व उपप्रादेषिक परिवहन कार्यालय, अहमदनगर येथील दोन पंच यांना व सापळा पथकातील कर्मचारी यांना त्यांचे कार्यालयीन कक्षात बोलावून घेतले. तेथे पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी माझी व पोनि गोर्डे, दोन पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांची आपसात ओळख करुन दिली. तसेच पोनि गोर्डे यांना पुढील सापळा कारवाईचे कामकाज करणेबाबत कळविले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी सांगितले की, '' मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन माझे देहरे गावात किराणा दुकान आहे. माझ्या दुकानात बाजरी,ज्वारी,गहु व इतर किराणा साहित्य विक्रीस असते. देहरे गावातील स्थानिक लोक माझ्या दुकानातुन किराणा साहित्य विकत घेत असतात. तसेच काही नागरीकांकडे असलेला शाळा वाटपाचा तांदुळ माझ्या दुकानात आणुन देतात व त्या बदल्यात माझ्याकडुन इतर धान्य तसेच किराणा सामान घेवुन जातात. माझ्या गावातील लोकांनी आणुन दिलेला तांदुळ मी मार्केट यार्ड अहमदनगर येथील ताराचंद बोथरा यांचे दुकानात विकत होतो. त्या तांदळाच्या बदल्यात मी त्यांचेकडुन गहु, ज्वारी, बाजरी विकत घ्यायचो व माझ्या दुकानात आणुन विकायचो. तीन ते चार महिन्यापुर्वी मार्केट यार्ड येथे ताराचंद बोथरा यांचे दुकानावर कोतवाली पोलीसांनी रेड करुन त्यांचे कडे मोठया प्रमाणात रेशनचा तांदुळ मिळाला म्हणुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांना कोतवाली पोलीसांनी अटक केली होती. त्या दरम्यान पोलीसांनी सदरचा तांदुळ कोणाकडुन घेतला याबाबत बोथरा यांना विचारणा केली असता ताराचंद बोथरा यांनी माझ्याकडुन तो तांदुळ विकत घेतल्याबाबत पोलीसांना सांगितले होते. त्यामुळे दि. 15/02/2023 रोजी सायंकाळी 07.45 वा. दरम्यान माझे मुलाचे मोबाईल नंबर 8624059567 यावर मो.नं. 8788362926 या क्रमांकावरुन कॉल आला असता मी गोरक्ष काळे पोलीस बोलतोय, तु व तुझे वडिल उदया कोतवाली पोलीस स्टेषनला या, तुमचे जबाब घ्यायचे आहेत असे म्हणुन कॉल कट केला. त्यानंतर एमआयडीसी पोलीस स्टेषनचे गागुंर्डे पोलीस यांनी दि. 16/02/2023 रोजी 10.15 वा. दरम्यान माझे मुलांच्या मोबाईलवर कॉल करुन तु आणि तुझे वडिल कोतवाली पोलीस स्टेषनला जावुन या, तेथील पोलीस काय म्हणतात ते पाहुन या असे म्हणाले. त्यानंतर मी व माझा मुलगा राहुल असे आज दुपारी 01.30 वा. दरम्यान कोतवाली पोलीस स्टेषन येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी गोरक्ष काळे पोलीस यांच्या मोबाईलवर कॉल करुन त्यांना कुठे आहेत असे विचारले त्यावेळी त्यांनी दुसÚया मजल्यावर असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दुसÚया मजल्यावर जावुन एका साधे वेषातील व्यक्तिस गोरक्ष काळे कोण आहेत विचारले असता त्या व्यक्तिने मीच गोरक्ष काळे आहे असे सांगितले. त्यावर माझ्या मुलाने त्यांना काय झाले असे विचारल्यावर ते म्हणाले की, तु ब-याच महिन्यानी आलास, ती बोथराची केस होती. त्याच्यामध्ये तुझे नाव होते, तु त्यांना रेषनिंगचा तांदुळ कुठुन आणुन देत होता आणि किती दिवसाला दयायचा, तुझ्याकडं रेषनिंग दुकान आहे का चालवायला. असे विचारले त्यावर माझा मुलगा नाही म्हणाला. त्यानंतर ते म्हणाले हा तांदुळ कोठुन आला. त्यावर माझे मुलाने सांगितले आमचे कडे किराणा दुकान आहे. महिन्या-पंधरा दिवसाला आमचे कडे गोर गरीब ग्राहक दोन किलो पाच किलो तांदुळ विकायला आणायचे व त्याबदली किराणा व धान्य न्यायचे. ते तांदुळ दोन पाच कट्टे बोथरा यांना देवुन त्या बदली धान्य घ्यायचो असे सांगितले. त्यानंतर तेथेच असलेले निपसे पोलीस यांनी माझे मुलांचे आधार कार्ड व पॅन कार्ड त्यांचे मोबाईलमधील व्हॉट्सअपला पाठविण्यास सांगितले. त्यानंतर निपसे पोलीस यांनी माझे मुलांचा जबाब घेवुन तो टाईप करुन षिंदे साहेबांना दाखविला. त्यानंतर षिंदे साहेबांनी मला खाली त्यांचे कक्षात बोलावले त्यांनी माझे मुलाची असलेली फाईल बघितली. व माझे मुलास चोविस तासासाठी आतमधी ठेवा आणि कोर्टाकडुन याला जामिन मंजुर करा असे बोलुन व आम्हाला जा असे म्हणाले. त्यानंतर आम्ही दुस-या

मजल्यावर गेलो. तेथे निपसे व काळे पोलीस होते. निपसे पोलीस यांना माझा मुलगा म्हणाला 'काय झाले सर,? त्यावर निपसे पोलीस म्हणाले, 'तुला एमआयडीसी पोलीस स्टेषन येथे 24 तास अटक करुन ठेवण्यात येईल व नंतर तुला कोर्टाकडुन जामिन घ्यावा लागेल.' त्यावर मी निपसे पोलीस यांना म्हणालो की, माझ्या मुलाने काहीच केलेले नाही. कशाला तक्रार करता, कशाला अटक करता ? त्यावर निपसे पोलीस यांनी मला 50,000/- रूपये दयावे लागतील, मग काहीच होणार नाही, असे सांगितले व माझ्या मुलास कोतवाली पोलीस स्टेशन मध्येच थांबवुन ठेवुन मला पैसे आणण्यास सांगितले. मला गोरक्ष काळे पोलीस व शिंदे साहेब यांनी पैशाची मागणी केलेली नाही. त्यानंतर पैसे आणण्याच्या निमित्ताने मी बाहेर पडलो. निपसे पोलीस माझ्या मुलावर कारवाई न करण्यासाठी 50,000/- रूपये मागत असलेली रक्कम ही लाच असल्याचे माझे लक्षात आले. मला निपसे पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नाही '' अषी तक्रार दिली. पोनि गोर्डे यांनी मला माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता मी त्यांना मला व्यवस्थित लिहिता येत नसल्याचे सांगितल्याने माझी तक्रार मी सांगितलेप्रमाणे ला.प्र.वि. कार्यालयातील पोकॉ कराड यांनी लॅपटॉपवर टंकलिखित केली, ती मी वाचुन पाहिली, ती मी सांगितलेप्रमाणे बरोबर टंकलिखित केली आहे. सदर तक्रारीची प्रिंट काढलेनंतर त्यावर मी, दोन्ही पंच व पोनि गोर्डे यांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर मी निपसे पोलीस यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डर चा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हॉईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोनि गोर्डे यांनी मला माझे वाहनांबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझेकडे सध्या वाहन नसुन मी रिक्षाने आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर चालु करून तो माझे पॅन्टचे चोर खिषात ठेवुन त्याची दोरी माझे पॅन्टचे बेल्ट लावण्याच्या लुपला बांधुन मला पंच नं 1 यांचेसह निपसे पोलीस यांची कोतवाली पोलीस स्टेषन येथे भेट घेण्याकरीता रवाना केले. मी व पंच नं. 1 असे आॅटो रिक्षाने कोतवाली पोलीस स्टेषन येथे जावुन पोलीस स्टेषनच्या वरील मजल्यावर गेलो. तेथे एका कक्षात मी व पंच नं.1 असे गेलो. त्याठिकाणी माझा मुलगा राहुल हा बसलेला होता. तसेच निपसे पोलीस तेथे हजर होते. त्यावेळी मी पंचांसमक्ष निपसे पोलीस यांची भेट घेतली. त्यावेळी निपसे पोलीस यांनी पंच नं. 1 यांचेविशयी हे कोण आहेत ? असे विचारले असता मी हे माझे जावई असल्याबाबत सांगितले. त्यानंतर त्यांनी आम्हाला खाली येण्यास सांगितले. त्यानुसार आम्ही सर्वजण खाली आलो. खाली आल्यानंतर आम्ही तेथे थांबुन राहिलो त्याठिकाणी माझी पत्नी कविता, पुतणी अर्चना व जावई आनंद गांधी हे देखील तेथे आले होते. हे सर्वजण तेथे हजर असल्यामुळे निपसे पोलीस माझ्याषी काहीएक बोलले नाही. थोडया वेळाने निपसे पोलीस यांनी मला वरच्या मजल्यावर बोलावले. पंच व नातेवाईक यांना तेथेच थांबून राहण्यास सांगितले. त्यानुसार पंच व नातेवाईक खाली थांबुन राहिले. नंतर मी व निपसे पोलीस वरच्या मजल्यावर गेल्यानंतर त्यांचेषी चर्चा झाली. त्यावेळी मी माझ्या मुलाला सोडण्याकरीता विनंती केली असता त्यावर निपसे पोलीस यांनी माझा मोबाईल घेवुन त्याचे डायल पॅडवर 50 असे टाईप करुन मला दाखविले. त्यावर मला काही समजत नाही, तुम्ही तोंडाने बोला असे मी त्यांना म्हणालो असता त्यावर निपसे पोलीस समजत नाही म्हणजे कसे काय ? असे बोलले. त्यावर मी त्यांना 50,000/- रु. का ? असे म्हणालो व काही तरी कमी करा असे म्हणालो असता त्यावर ते काहीएक बोलले नाही. त्यानंतर माझा मोबाईल माझ्या ताब्यात दिला व आता तुम्ही जा, सकाळी या असे म्हणाले.

त्यानंतर मी खाली आलो. सदर घडला प्रकार पंचाला सांगीतला. त्यावेळी मी व पंच असे पोलीस स्टेषनच्या समोरील बाकडयावर बसलो होतो, थोडया वेळाने निपसे पोलीस त्या ठिकाणी आले, मला बाजुला बोलावुन घेतले व पंचाला तेथेच बसण्यास सांगीतले. त्यावेळी पंच बाकावर बसुन राहीले, निपसे पोलीस मला घुमट बिंल्डींग मध्ये घेवुन गेले. त्याठिकाणी त्यांनी तेथील खोलीचा दरवाजा आतुन बंद केला व मला खिषातील सर्व वस्तु टेबलवर ठेवण्यास सांगितल्या. त्यावेळी त्यांचे सांगण्यावरुन मी माझ्या खिष्यातील सर्व वस्तु बाहेर काढुन तेथील टेबलवर ठेवल्या. त्यानंतर निपसे पोलीस हे बळजबरीने माझी अंगझडती घेवु लागले असता त्यावेळी मी त्यांना प्रतिकार केला, परंतु त्यांनी मला धक्काबुक्की करुन माझी बळजबरीने अंगझडती घेतली. त्यावेळी माझ्या पॅंटच्या उजव्या बाजुच्या चोर खिष्यात ठेवलेला व्हॉईस रेकॉर्डर निपसे पोलीस यांच्या हाताला लागला. त्यावेळी त्यांनी तो व्हॉईस रेकॉर्डर माझ्या पॅंटच्या चोर खिष्यातुन हिसकावुन बाहेर काढला. तो व्हॉईस रेकॉर्डर दोरीच्या साहायाने माझे पॅन्टच्या बेल्ट लावण्याच्या लुपला बांधलेला असल्यामुळे पॅन्टचे लुप तुटले व माझे ताब्यातील षासकीय व्हॉईस रेकॉर्डर बळजबरीने त्यांनी त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी निपसे पोलीस मला म्हणाले हे धंदे करतो का ? असे बोलून व्हॉईस रेकॉर्डर

घेवुन तेथून निघुन गेले. त्यानंतर मी घुमट बिल्डींग मधुन बाहेर येवुन सदर घडला प्रकार पंचांला सांगीतला. त्यावेळी पंच नं.1 यांनी कराड पोलीस यांचे फोनवर फोन करुन पोनि गोर्डे यांना सदरचा प्रकार सांगितला. त्यानंतर आम्ही दोघे पोनि गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे परत आलो. त्यावेळी मुलगा राहुलने फोन करुन सांगितले की त्याला पोलीसांनी सोडुन दिले आहे. पोनि गोर्डे यांनी निपसे पोलीस यांचे नावाबाबत खात्री केली असता त्यांचे नावे एकनाथ पंडीत निपसे, पोलीस हवालदार/1466, नेमणुक- कोतवाली पोलीस स्टेषन असे असल्याचे माहिती मिळाली आहे.
तरी दि.16/02/2023 रोजी 17/09 ते 19/30 वा चे दरम्यान लाच मागणी पडताळणी कारवाईच्या वेळी कोतवाली पोलीस स्टेषन येथे लोकसेवक एकनाथ पंडीत निपसे, पोलीस हवालदार/1466, नेमणुक- कोतवाली पोलीस स्टेषन यांनी माझ्या मुलाला गुन्हयात अटक न करण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रु. लाच मागणी केली व लाच मागणी पडताळणी दरम्यान निपसे पोलीस यांना माझा संषय आल्याने त्यांनी माझेकडील दिलेला शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व त्यातील मेमरी कार्ड असे 7000/रु किंमतीचे अंदाजे असे माझे ताब्यातुन मला धक्काबुक्की करुन बळजबरीने हिसकावुन घेवुन निघुन गेले आहेत. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे. पुढील तपास पो नि शरद गोर्डे ला प्र. वि . अहमदनगर हे करीत आहेत

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SAMPATRAO SAKHARAM SHINDE(I (Inspector)) / POBN60370 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ना./१५७३ एम.डी.बोरुडे
नेम.कोतवाली पो.स्टे., अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SAMPATRAO SAKHA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN60370